पुणें

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ

पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक ४

शिवचरित्र प्रदीप

द. वि. आपटे

स. म. दिवेकर

कागदी प्रत रु. ३॥]   शके १८४७   [कापडी प्रत रु. ४

चिपळोनात लस्करची पाहणी केली
कलम १
आणि बहिरराव(७६) मोहिते यासी
सरनोबती दिली कलम १

शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरे फाल्गुन वा। ३ शुक्रवार हस्त घटी १८ प ३२ गंड ५॥७ ते दिवसीं राजश्री सिवाजी राजे सिवनेरीस उपजले कलम १

शके १५७९ हेमलंबी नाम संवत्छरे जेष्ट शु॥ १२ गुरुवारी घटी १० ते दिवसी राजश्री सिवाजी राजे यास संभाजी राजे पुत्र जाहले कलम १

---

८ गदाधर प्रल्हाद शकावली

(संपादक—**कृष्णाजी वासुदेव पुरंदरे.**)

शाहूचे प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद यांचा शिवकालीन रावो बल्लाळ अत्रे यांच्या वंशजाशीं शरीरसंबंध होता. चांबळीस रावो बल्लाळ अत्र्यांचा सख्खा भाऊ काळो बल्लाळ याचा वंश राहतो. त्यांचे विद्यमान वंशज विष्णु गोविंद अत्रे यांचें दफ्तर चाळीत असतां जे कित्येक कागद मिळाले त्यांत एक कागदाची वळकटी मिळाली. वळकटी गळाठ्यांत असल्यानें ती वरून झडत चाललेली होती. वळकटी उघडतां तिचें स्वरूप खालील प्रमाणें दिसून आलें. गदाधर प्रल्हाद यांस शाहूमहाराज, धनाजी जाधव, बाळाजी विश्वनाथ वगैरेंचीं आलेलीं असल पत्रें एकापुढें एक चिकटवून त्यांच्यामागें शकावली लिहिण्यांत आलेली आहे. जपून ठेवणारानें ही वळकटी तीवरील शकावली करितांच जपून ठेवल्याचें स्पष्ट दिसतें. त्याला पत्रांची किंमत वाटली नाहीं. परंतु शकावली इतकीच पत्रांची किंमत आहे. तूर्त शकावलींत काय आहे तें पाहूं. शकावलीचा आरंभ कोठपासून होता हें वरील पानें फाटल्यानें कळत नाहीं. आरंभींचीं जशीं कांहीं पानें गेलीं आहेत त्याप्रमाणें शेवटचेंही एकादें अर्धें पान गेलें असावेंसें वाटतें. साधारणपणें यांत शके १६०२ ते १६२८ पर्यंतची शकावली आहे. जेधे शकावली शके १६१९ अखेर आहे व शिवापुरकर शकावली १,९६ अखेर व ही शके १६२९ अखेर आहे म्हणजे हिच्यांत जेध्यापेक्षां दहा सालें अधिक आहेत. मधलीं पानें गेलेलीं नाहींत, असें असूनही जेधे शकावलींत असलेलीं शके १६०७ ते १६०९ पर्यंतचीं सालें हींत नाहींत. ही शकावली जेधे व शिवापूरकर

---

७६ हंबिरराव जे. श.

यांच्या शकावलीशीं बहुतेक बाबतींत जुळते. पण ही या दोहींपैकीं कोणाचीही नक्कल नव्हे हें मात्र खास. जेधे शकावली प्रसिद्ध झाल्यानें शके १६१९ अखेर सालांतील राजकीय उलाढालीवर जसा शोध लागला गेला त्याप्रमाणें या शकावलीच्या प्रकाशनानें १६१९ ते २९ च्या दाहा वर्षांवर लागणार आहे. जेधे व शिवापुरकर शकावलींत आलेलीं सालें टाळून पुढील सालें येथें दिलीं आहेत.

गदाधर प्रल्हादकडून ही शकावली अत्रे घराण्याकडे आली असल्याबद्दल पुरावा मिळतो. म्हणून हिला आपण 'गदाधर प्रल्हाद' शकावली म्हणूं.

ज्या पत्रांवर ही उतरली आहे त्यांपैकीं कित्येकांचा कालनिर्णय स्पष्ट आहे. शाहूमहाराजांचें राजशक ३६ मधील एक आज्ञापत्र आहे. त्यावरून व अक्षराचें वळण इत्यादि साधनांवरून ही राजशक ३६ च्या नंतर लवकरच लिहिली गेली हें स्पष्ट ठरतें.

शके १६१९ ईस्वर संवछरे

चैत्रमासे सताजी घोरपडा सातारे प्रांते आला त्यावरी गाजदीखान नामजद आला १

श्रावणमासी वद्य ११ सोमवार राजारामानी कर्ण मोगलाईत पाठविला १

पौष्य वदि १२ संक्रातीचे दिवसी जुल्फुकारखानें दगा देऊन चंजी चनगडच गवीनें चढोन घेतली राजाराम पळोन पौष्य वदि नवमीस येलुरास गेले १

आषाढ मासी सताजी घोरपडियास नागोजी माने याने माहादेवाजवली दगा देऊन मारिले १

मार्गेसरमासी शुध ५ मोगलानी चंजीस वेढा घातला १

फालगुन वदि ७ भौमवासरी राजाराम खेलणियास आले धनाजी-जाधव येलुरास जाऊन घेऊन आले त्यावर बेदारबख्तास पातशाई नामजाद केले १

शके १६२० बहुधान्य संवछरे

मार्गसीर मासी चंजीकडे गेला खलणीयाहून गेले त्याच्या पाठीवरी बेदारबख्त गेला

माघ मासी गाजदीखान बेरडासी सला करून देवगड बख्तबुलंदे फिसादी केली त्यावरी गेला १

फालगुनमासी राजाराम मागती चंदीहून प्रांतीहून फिरोन खिलणीयास आला गदकाजवली शाहाजादियास लडाई दिल्ही

जेष्ठ अधिक वद ८ सोमवार घ १ प १३ वर्तमान ९ पु० भा० २३ प ५६ प्रीती २३ । ५६ रात्रौ ग० घा १२ प ३० राजारामास पुत्र जाला नाव संभाजी ठेवले

शके १६२१ प्रमाथी संवछरे

कार्तीकमासी औरंगशा + खासा आपण मोहीम + न ब्रम्हपुरीहून ठा + + + + + + + + + + + राजाराम पलोन फौजेबराबरी + + गडात गेला त्याच्या पठीवरी बेदारबख्त जुलपुकारखान आला त्यास पाठी-वरी पीढा करावयास पाठविले १

मार्गस्वरमासी आवरंगजबे वसंतगड घेऊन सातार्‍यास वेढा आपण जाऊन घ तला

पौशमासी राजाराम फिरोन राजगडास आले धनाजी जाधव येऊन ब्रह्म-पुरीस पातशाही बुणगे होते ते लुटिले १

फालगुण वद्य नवमीस राजाराम यांही कोंढाणयावरी देह ठेविला १

त्याचे पुत्र सिवाजी राजे राज्य करू लागले ते समई वये वरशे पाच १

शके १६२२ विक्रम सवत्सरे

चैत्र शुध १३ सातारागड सुभानजी भाडवलकर याही सलाबक······ गडा पादशाहास(१)दिल्हा + + + मासी पातशाहानी परली जाऊन वेढा घातला १

+ + र्शी मासी जुल्पुगारखान व बेदारबख्त यानी पनालियास वेढा घातला फालगुण सुध १३ आवरंग-जेब पनालियासि आले पर्वतास सिला जां केले १

आशाड मासी आवरंगजेब सलाह क-रून परली घेतली आणि भूषणगडान-जीक माइणीवर छावणी कली १

कार्तिकमासी पातशाहा खवासपुरी येऊन उतरला असता माणनदीस पूर येऊन लस्कर वाहवले १

शके १६२३ वृष सवत्सरे

जेस्ट वद्य १४ द्रव्य ५५ हजार + + देऊन किला पनाला घेतला पात-शाहा छावणी करावयासि बुध पांचे-गावास गेले १

आश्वीन मासी बेदारबख्त याने समानगड वर्धनगड कलानिधी तिनी किले घेतले १

भाद्रपदमासी बहिरमदखान जाऊन चंदन वंदन व नांदगीर सलाह करून घेतला १

मार्गस्वर मासी आवरगजेब येऊन खेलणीयासि वेढा घातला गाजदी-खानास मार्ग चालवावयासि ब्रम्ह-पुरीस ठेविले १

चित्रभानु संवत्सरे शके १६२४

जेस्ट वद्य ७ खेलणा दोन लाख रुपये देऊन परशरामपंतापासून

पौशमासी पातशाहा येऊन कोंढाणि-यासि वेढा घातला तेच मासी नेमा-

किला घेतला आणि पनाल्याजवली वडगाव आहे तेथे छावणी केली पावसानें लस्कर फार मेले १

+ श वद्य १० बवडाजवल येका + कोसावरी बा आहे तेथे गारा पडल्या अतिशये पडल्या १

जी सिदा व केसोपंत नर्मदेपलीकडे जाऊन सिरोज मारली १

शके १६२५ सुभान नाम संवत्सरे

वैशाख शुध नवमीस कोढाणा सला करून घेतला रुपये पनास हजार दिल्हे मग पुणियामध्ये येऊन छावणी केली तेच वरशी प्रज्यन्य जाऊन देशात दुकाल पडला २

मार्गस्वर मासी नमाजी सिंदे व केसोपती सर्जाखानासी लडाई करून कैद केला दोन हजार घोडे आकरा हती घेतले तीन लाख रुपये घेऊन सोडून दिल्हा १

माघमासी नेमाजी सिदा व केसोपत व परसोजी भोसले पनास हजार स्वार मिलोन नर्मदा उतरोन कालाबाग पावेतो गेले त्याचे पाठीवरी गाजदीखानास रवाना केले १

कार्तिक शुध १४ पुणियाहुन कुच करून पातशाहा जाऊन राजगडास वेढा घालून बैसले १

पाच सेर रुपयाची धारण खाली खानदेश वराड देशात कुल दुकाल पडला

माघ वद्य नवमीस राज ++(गड?) पातशाहानी सला करून घेतला फालगुण मासी तोरण्यासि माला लाऊन घेतला .

तारण सवछरे शके १६२६

वैशाखमासी पातशाहा येऊन खेड कडुसावरी छावणी केली १

पौश मासी लोहगड म++(राठ्या?) नी माला लाऊन घेतला १

कार्तिक वद्य १३ आवरंगजेबे खेडकडूसीहून कुच करून पेडगावावरून सुर मा शा सगरावरून वाघनगरेयासि जाऊन माघमासी वेढा घातला

शके १६२७ पार्थिव सवछरे

वैशाख वद्य ४ वाघनगेरे आवरंगजबाने घेतले बेरड कोट टाकून पलोन गेला १

कार्तिक मासी शुध चतुर्दसीस पात-

जेस्ट मासी पलेकिडे ती कोसावरी पातशाहानी कृष्णातीरी छावणी केली १

आषाढ मासी कोढणा माला लाऊन मऱ्हाठियानी घेतला १

शाने कुच करून पौश शुध प्रतिपदेस पेडगावास गेले तेथे रमजान केला मग माघ वद्य १ प्रतिपदेस नवाब जुलपुकारखानास समागमें राजश्री शाहू राजे जालीतून काहाडून दिल्हे आणि कोढाणि घावयास रवाना केले आणि पातशाहा कुच करून फालगुन सुध ६ अहमदनगरास येऊन मुकाम केला १

शके १६२८ व्यये संवछरे

चैत्रमासी धनाजी जाधव कुल फौजेनसी येऊन पातशाही लस्करासी मुकाबिला येऊन लडाई केली १
वैशाख सुध येकादसी आजमशाहा जुनराहून येऊन अहंमदनगरी मुलाजीमती केली १
माघ वद ३० अमावासेस सुक्रवारी दो प्रहरां औरंगजेबे अहमदनगरी परलोकास गेला आजमशाहा फिरोन सलाबतपुरीहून फालगुन सुध प्रतीपदेस लस्करास अले अमवाल जप्त केला १

फालगुन कामबकस विजापुरी बदल जाले अमल जारी केला १

चैत्र मासी कोढाणा जुलपुकारखाने कोढाणा द्रव्य देऊन कबज केला १
माघ वद्य ७ कामबकसास औरंगशाहे विजापुरीचा सुबा देऊन रुकसत केले १
माघ वद्य द्वदसीस पादशाहे अजमशाहास उजनीचा सुबा देऊन आपणापासून रवाना केले १
फालगुन सुध येकादसी मगलवारी अजमशाहा सिहासनी बैसले फालगुन वद प्रतिपदा शनिवारी कुच करून दिलीवरी चालिले १

शके १६२९ सर्वजित संवछरे

चैत्र सुध प्रतिपदा अजमशाहा औरंगाबादेस दुसरे दिवसी कुच करून दिलीवरी चालिले दक्षेणेस गाज (अपूर्ण)

चैत्र सुध प्रतिपदेस जुलपुकारखान व राजा शाहु येऊन आजमशाहाची मुलाजमती औरंगाबादेस घेतली